# वाचन चाचणी (१)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

गोष्ट

दाजी आजोबा आजारी असतात. ते खूप थकलेले दिसतात. हल्ली त्यांना नीट दिसत नाही. आजोबांचा नातू रमेश त्यांची खूप काळजी घेतो. त्यांना खूप खोकलाही झाला आहे. रमेश त्यांना वेळेवर औषध देतो. नीट दिसत नसल्यामुळे आजोबा घरात बसून असतात. रमेश त्यांच्या हाताला धरून घरातल्या घरात फिरवतो. घरात बसून आजोबा जुनी गाणी ऐकतात. त्यांना नवीन गाणीही ऐकायला आवडतात. आजोबांना बरे वाटल्यावर दोघे लांबवर फिरायला जाणार आहेत.

परिच्छेद

आज गावाहून मामा आला.
मला खाऊ व फुगे घेऊन आला.
ताईला बाहुली घेऊन आला.
आईला छान साडी आणली.

परिच्छेद

आज रविवार आहे.
शाळेला रजा आहे.
तरी आज सकाळी मला
लवकर जाग आली.

# वाचन चाचणी (१)

**शब्द**

खडू

टोपी

पतंग

लाल

विमान

केळे

चौदा

पाऊस

झाडू

सैल

५ पैकी ४ शब्द बरोबर असणे जरूरीचे आहे.

**अक्षर**

ख

ब

ल

ग

फ

ड

भ

ण

ढ

व

५ पैकी ४ अक्षरे बरोबर असणे जरूरीचे आहे.

# वाचन चाचणी (२)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

गोष्ट

पाखरांची शाळा आंब्याच्या झाडावर भरली होती. सर्व पाखरे झाडावर बसली होती. चिमण्यांचा गोंगाट फारच होता. सर्व कावळे बाराखडी म्हणत होते. पोपट मात्र मस्तीच करत होते. कबुतरे, बुलबुल सर्व पक्षी फांदीवर बसले होते. सर्व पक्षी शिक्षक येण्याची वाट पाहत होते. कोकिळाताई संगीत वर्ग घेण्यासाठी आली. सर्व पाखरे गाऊ लागली. काठी घेऊन आजी अंगणामध्ये धावत आली. घंटा न वाजता शाळा सुटली.सगळे पक्षी आकाशात उंच उडाले. आजी पक्ष्यांकडे बघत राहिली.

परिच्छेद

औषध कडू असते.
सुनंदा औषध नको म्हणते.
आई तिची समजूत घालते.
औषध घेतले की साखर देते.

परिच्छेद

पावसाळा सुरु झाला.
आईने नवी तुळस लावली.
तुळस भरभर वाढली.
छान दिसू लागली.

# वाचन चाचणी (२)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

**शब्द**

कागद

दिवा पैज

पाऊस

हळू गाडी

औत

वेडा बोट

गुरे

कोणतेही पाच विचारा. ५ पैकी ४ बरोबर असणे जरुरीचे आहे.

**अक्षर**

क

स ग

ल

न द

ब

र म

ल

कोणतेही पाच विचारा. ५ पैकी ४ बरोबर असणे जरुरीचे आहे.

# वाचन चाचणी (३)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

गोष्ट

एक होती आजी. एकदा तिला तिच्या बहिणीचे पत्र आले. आजीला तिने आपल्या घरी पूजेला बोलाविले होते. आजीने आपल्या सामानाचे गाठोडे बांधले. निघताना तिने घराला कुलूप लावले. ती प्रवासाला पायी निघाली. वाटेत आजीला झरा दिसला. चालून चालून थकल्याने ती झऱ्याकाठी बसली. थोडे खाऊन ती थंड पाणी प्यायली आणि झोपी गेली. काही वेळाने समोरून एक टांगा आला. टांग्यातील माणसाने तिला बहिणीकडे सोडले. आजीने त्याचे आभार मानले आणि ती घरात गेली.

परिच्छेद

फुगेवाला आला.
लाल, निळे फुगे आणले.
मुलांनी फुगे घेतले.
हातातून ते सुटून गेले.

परिच्छेद

दादा गाडी चालवतो.
गाडी फार छान आहे.
तो गाडी घेऊन येतो.
मी बसून गावाला जातो.

# वाचन चाचणी (३)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

**शब्द**

समई
बस
गरम
कैरी
दिवा
मोती
किरण
चिमटा
तूप
मौज

५ पैकी ४ शब्द बरोबर असणे जरूरीचे आहे.

**अक्षर**

श
प
स
ड
य
द
ज
ह
त
म

५ पैकी ४ अक्षरे बरोबर असणे जरूरीचे आहे.

# वाचन चाचणी (४)

गोष्ट

सोनू आणि मोनू जिवलग मित्र होते. दोघे नेहमी सोबत असायचे. फिरायला सोबत जायचे. कामालाही एकत्र जायचे. सोबतच जेवायचे. दोघे सारख्याच रंगाचे कपडे वापरायचे. सोनूने लाल शर्ट शिवला की मोनू पण लाल शर्ट शिवत असे. मोनूने निळी टोपी घातली की सोनूही निळी टोपी घालायचा.त्यामुळे बरेचदा लोकांना दोघे सख्खे भाऊ वाटत. दोघांना सोबत बघून लोकांना गंमतच वाटे. सोनू आणि मोनूलाही आपल्या मैत्रीचा अभिमान वाटत असे.

परिच्छेद

दादा बस चालवतो
बस लाल आहे
तो डेपोत जातो
बस घेऊन येतो

परिच्छेद

ताई दोरी खेळते.
मला घेत नाही.
मी रडत बसते.
ताई म्हणते, खेळायला ये.

# वाचन चाचणी (४)

Annual Status of Education Report
असर ASER 2015 RURAL
Facilitated by PRATHAM

**शब्द**

आरसा

शिवली काकडी

फेरी

टोपली मुली

चौकी

फुगा मोर

उंदीर

**अक्षर**

ख

ब ल

ग

फ ड

भ

ण ढ

व